॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्यावतीने दोन कंपन्यासाठी झालेल्या परिसर मुलाखतीमध्ये संगणकशास्त्र प्रशाळेतील १७ विद्यार्थ्यांची निवड झाली.

संगणकशास्त्र प्रशाळे अंतर्गत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पँथरनेल्स आणि आरबीआयएस टेक्नालॉजी प्रा. लि. या दोन कंपन्यांसाठी ऑनलाईन व ऑफलाईन मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीच्यावतीने रुपेश तेलंग, पवन बारी, रूपचंद जावळे, कोमल चौधरी व श्वेता देसाई हे अधिकारी उपस्थित होते. पँथरनेल्स या कंपनीसाठी राजश्री चौधरी, कल्याणी पाटील, प्रियंका माळी, प्राली गिरासे, गौरव पाचपांडे, अश्विनी भदाणे, हर्ष सोनवणे, दुर्गेश वारके, गौरव गुंजाळ, प्रियंका राठोड, शुभम छनवाल, संजना अंदुरकर, दुर्गेश रणदिवे, लोकेश पाटील या विद्यार्थ्यांची निवड झाली तर आरबीआयएस टेक्नालॉजीसाठी धनेश्वर भक्त, राहुल तेली व राहुल सांळुखे या विद्यार्थ्यांची निवड झाली. प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा, संगणकशास्त्र प्रशाळेचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. संदीप भामरे यांनी मुलाखतीचे व्यवस्थापन केले. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक डॉ. एस. आर. कोल्हे, प्लेसमेंट कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्जवल पाटील यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध प्रशाळांमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली.

संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हिल फाउंडेशन यांच्यात सामजंस्य करारान्वये सायबर सुरक्षेबाबत सातत्याने जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येतात. सध्या सायबर क्राईमच्या घटना वाढल्या आहेत. ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे घडत आहेत. या सगळयाबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून कोणती खबरदारी घेतली पाहिजे. याबाबत माहिती देण्यात आली. प्रशाळेचे संचालक डॉ. सतिश कोल्हे, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेन्द्र कापसे, प्रा. मनोज पाटील, ठकन जानगवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आशिष पाटील, राजश्री कापुरे, पायस सावळे, पौर्णिमा चौधरी, कुणीका खैरनार, दर्शना हिरे, वैष्णवी सांळुके, नेहा पवार, लिना भोंडे, संजना अंदुरकर, गौरव चौधरी, गजानन घुले यांनी विविध प्रशाळांमध्ये जावून सायबर सुरक्षेततेबाबत माहिती दिली.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरू असलेल्या ज्येष्ठ नागरिक शिबिरा दरम्यान ज्येष्ठ नागरिकांप्रती संवेदना व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यापीठात शुक्रवार दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी सायकल रॅली काढण्यात आली.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे दि. १० ते १४ ऑक्टोबर या कालावधीत ज्येष्ठ नागरिक सहायता दुत प्रशिक्षण शिबीर सुरू आहे. शुक्रवारी सकाळी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारापासून ते सिनेट सभागृहापर्यंत सायकल रॅली काढण्यात आली. यावेळी जिल्हा परिवहन अधिकारी श्याम लोही, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राहुल इंधे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, सिनेट सदस्य ॲड. केतन ढाके, संचालक प्रा. आशुतोष पाटील, योग मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख राजेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. रॅलीमध्ये जळगाव शहरातील सायकलपटू कामिनी धांडे, रसिका भोळे, रसिदा चुनावाला, छाया ढोले, डॉ. अनघा चोपडे, आरती व्यास, सुनील चौधरी, राम घोरपडे, सखाराम ठाकरे, राजु मराठे, राजु सोनवणे, रूपेश महाजन, आदर्श पाटील, गोपी महाजन, समीर रोकडे, भुपेश व्यास, सुभाष पवार, डॉ. सुयोग चोपडे, राजेश काळे, अतुल सोनवणे, दिपक पाटील, दिलीप मालुसरे तसेच शिबिरातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी सहभागी होते.

……………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १३ ऑक्टोबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी